# <u>दिनांक ०८.०४.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत</u>

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक ०८.०४.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त (१), महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. २, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती
मा.स.स.न.र., महानगरपालिका, अमरावती
मा.शहर अभियंता, महानगरपालिका, अमरावती
मा. कार्यकारी अभियंता, (सा.बां.वि.), अमरावती
श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती
श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ अमरावती
श्री.विलास देशमुख ,वृक्ष तज्ञ, अमरावती
मा. सिस्टीम मॅनेजर, महानगरपालिका, अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

## दि.०८/०४/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

# झोन क्र.१

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री. प्रल्हाद कृष्णराव मुळे, गाडगे नगर समाधी बाजुला, अमरावती | भिंगरी | ०१ | दि.०४/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता भिंगरी वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. सदर परिसरात एकमेव वृक्ष आहे. वृक्षाच्या इमारतीकडे झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या **<u>फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागामार्फत देण्यास हरकत नाही.</u>** फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही, याची दक्षता घ्यावी. वृक्षाच्या बुडाजवळ कचरा पेटविल्याचे दिसुन आले. संबंधीत एस.आय. ला याबाबत सुचीत करण्यात यावे व वृक्षाचे बुडाजवळ कचरा जाळू नये असे संबंधीतांना सुचीत करावे, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभाग मार्फत देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. राजेंद्र म. दासवत व रंगराव वि. कोकरे, हर्षराज कॉलनी, अमरावती. | पिंपळ-१, कडूनिंब-१, भिंगरी-१ | ०३ | दि.०५/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जात नमुद वृक्ष प्रथमदर्शनी रोडच्या मध्ये येत असल्याने दिसुन येते. सबब बांधकाम विभाग अभियंत्यानी वृक्ष रस्त्यावर येते किंवा कसे याबाबत अहवाल सादर करावा. त्यानंतर वृक्ष काढण्याबाबत निर्णय घेता येईल. **<u>तुर्त परवानगी नाकारण्यात यावी</u>**. वृक्षाला इजा पोहचवू नये, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ३. | श्री. जलालोद्दीन नजमोद्दीन सैय्यद, पॅराडाईज कॉलनी, अमरावती | पिंपळ | ०१ | दि.०५/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेला, ट्रीगार्ड मध्ये आहे. अर्जदारासी चर्चा केली. **<u>वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.</u>** वृक्षाला इजा पोहचवू नये, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ४. | मा. प्राचार्य कृषी विज्ञान पदविका अभ्यासक्रम रूरल इंस्टिटयुट, अम. | विविध प्रजातीचे | १२० | दि.०४/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराचे परिसरात बरीच वृक्ष आहेत. अर्जदाराला वाळलेली वृक्ष तसेच सागवृक्ष काढावयाची आहेत. सबब अर्जदारास माहिती मागविण्यात यावी. एकुण वृक्षापैकी कोणती वृक्ष (प्रजातीवार नियमानुसार) काढावयाची आहेत, याचा तपसिल कळल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. **<u>तुर्त परवानगी नाकारण्यात यावी</u>**, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ५. | सौ.सुनंदा बळीराम रांगोळे, महात्मा फुले नगर, अमरावती | सागवान-२, कडूलिंब-१ | ०३ | दि.०५/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराकडे असलेले **<u>दोन सागवृक्ष नियमानुसार (सागविषयी धोरणाधीन राहून) काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.</u>** साग वृक्ष ६० सें.मी. पेक्षा जास्त जाडीचे आहे. तसेच बाजुला सार्वजनिक जागेवर असलेला **कडूनिंब वृक्ष राखण्यात यावा व वृक्षाला इजा पोहचवू नये**, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे सागवान धोरणानुसार वृक्ष काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६. | उपविभागीय अधिकारी सा.बां.उपविभाग क्र.२, अमरावती विभागीय क्रिडा संकुल, अमरावती | विविध प्रजातीचे | १७ | दि.०४/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता रिटेनिंग वॉल करण्याचे कामात येणा-या वृक्षापैकी सर्व ४ वृक्ष वाचविण्याचे ठरविण्यात आले. उर्वरीत लिस्टनुसार **<u>१३ वृक्ष (सोबतच्या यादीनुसार) काढण्याची नियमानुसार परवानगी देण्यास हरकत नाही.</u>** नियमानुसर ठेव स्विकारून परवानगी देता येईल. परिसरातील इतर वृक्षांना इजा पोहचवू नये, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **१३ वृक्ष काढण्यास हरकत नाही** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७. | श्री. रविंद्र नामदेवराव माळवे, मेहरदिप कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती | कडुबदाम | ०१ | दि.०४/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करणेकरीता गेले असता घरमालक उपस्थित नसल्यामुळे स्थळ निरीक्षण करता आले नाही. प्रत्यक्ष स्थळ कोणाला माहिती नव्हते. सबब <u>प्रकरण स्थगीत ठेवण्यात यावे,</u> असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा.** | **सदर स्थळी पुन्हा पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

# झोन क्र.२

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **१** | **श्री. अनिल प्र. भटकर उपविभागीय अधिकारी सा.बा. उपविभाग क्रं.२** | **बकुळ वृक्ष शेवगा फांदया** | **१ १** | दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. प्रभाग क्रं. १३ राजापेठ अंबादेवी रोडवरील दिपार्चन समोरील रस्त्यावर एकविरा देवी मातेचे प्रवेशद्वार बांधत आहे. सार्वजनिक रस्त्यावर बांधकाम विभागाला प्रवेशद्वार उभारायचे असल्याचे सांगण्यात आले. बांधकामात येणारा १ वृक्ष बकुळ यास नियमानुसार तीन वृक्ष लावण्याचे व ठेव स्वीकारुन परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच दुस-या बाजुस असलेला शेवगावृक्षाच्या ४-५ इंच व्यासाच्या ४ फांदया काढण्यास मान्यता देण्यात यावी.<br>अर्जदाराची नियमानुसार बदली वृक्ष लावण्याची ठेव रक्कम ६०००/- रु उद्यान विभागात जमा करण्यात आली त्यानुसार एक बकुळ वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच एक शेवगा वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.जा.क्र.०६ दि. ०२/०४/२०२५ | **कार्योत्तर मंजुरी देण्यास हरकत नसावी.** | **सदर प्रकरणी वृक्ष काढण्यास व वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.** |
| २ | **श्री. प्रविण उत्तमराव दातीर रुख्मिनी नगर अमरावती** | **कडुनिंब वृक्ष** | **१** | दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. भिंगरी वृक्ष सार्वजनिक रस्त्याच्या कडेला छान वाढलेला हिरवागार आहे. कोणतीही अडचण नाही वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.वृक्षाला इजा पोहचवु नये असे आदेशित करण्यात यावे. दुसरा कडुनिंब वृक्ष अर्जदाराचे जुन्या घराच्या परीसरात छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्ष प्लॉटच्या कोप-यावर एका कडेला आहे. अर्जदाराला बांधकाम परवानगी मिळाली असुन वृक्ष बांधकामात येते किवा कसे या बाबत स्पष्टता नाही. सबब ससनर विभागाने कडुनिंब वृक्ष प्रत्यक्ष बांधकामात येत असल्यास लाल रंगाने चिन्हांकित नकाशामध्ये केल्यास वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार दिल्या जाऊ शकेल. तुर्त परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोहचवु नये असे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | **बांधकामात येणारा १ वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर एक कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | **श्री. नरेश रमनिकलाल देसाई लक्ष्मी विहार अमरावती** | **कडुनिंब वृक्ष पिंपळ वृक्षफांदया** | **२ १** | दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचा आणि वृक्षाचा काही संबंध नाही. नमुद सर्व वृक्ष सार्वजनिक जागेवर मंदिराचे परीसरात लागलेली व वाढलेली आहे. वृक्ष तोडण्याची फांदया तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी . वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे.<br>अर्जदाराचे स्वताचे घर ३०००/- स्के. फुट मध्ये बांधलेले | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.स्वतःचे घरी वृक्ष लावण्याचे सूचित करावे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे.एकही वृक्ष लावलेला दिसुन येत नाही. सबब अर्जदारास नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम प्रकरण ५, कलम ९(१) नुसार दोन वृक्ष लावण्याचे सुचित करण्यात यावे. व अहवाल पाठविण्यास सुचवावे. उचित निर्णयास सादर | | |
| ४ | **श्री. कैलाश मोतीराम ककरानिया रायली प्लॉट अमरावती** | **उंबर वृक्ष** | १ | दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. उंबर ( औदुंबर ) वृक्ष अर्जदाराचे राहत्या घराचे अंगणात छान वाढलेला व हिरवागार आहे. कोणतीही अडचण दिसुन येत नाही. नमुद कारणासाठी वृक्ष तोडण्याची परवानगी देता येत नाही. ( फळे येतात ) म्हणुन सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ५ | **मा. अध्यक्ष आर.बी. अटल हिंदु स्मशान संस्था अमरावती** | **पिंपळ वृक्ष** | १ | दि. १२/०३/२०२५ वृक्ष प्राधिकरण सभा ठराव क्रं. ७ नुसार १ वृक्ष तोडण्याच्या बदलीत बदली वृक्ष लावण्याकरीता ठेव रक्कम ६०००/- भरण्यास नोटिस देण्यात आली. त्यानुसार अर्जदार यांनी दि. २१/०३/२०२५ रोजी अर्ज सादर करण्यात आला. हिंदु स्मशान संस्थेद्वारे अंत्येष्टीचे कार्य होत असुन दरवर्षाला साधारण ४००० पेक्षा जास्त लोकांची अंत्येष्टी होत आहे. याशिवाय संस्थेद्वारे प्रत्येक अंत्येष्टी करीता येणा-या व्यक्तीस एक वृक्ष, शेणखत व पाणी देण्याकरीता एक बॉटल निःशुल्क देण्यात येत असुन दरवर्षाला साधारणतः ४००० पेक्षा जास्त वृक्ष लावण्यात येत आहे. पर्यावरणाची जोपासना व्हावी या दृष्टिने संस्थेत गॅस दाहिनीच्या तीन मशीन लावलेल्या असुन गॅस भट्टीवर दहनाकरीता संस्थेला एका व्यक्तिच्या दहनाकरीता ३०००/- रु खर्च येतो. गॅसवर संस्थेद्वारे निःशुल्क दहन करण्यात येते.अशाप्रकारे संस्थेद्वारे महानगरपालिकेचे कार्य बिनामोबदला करण्यात येत आहे. या करीता संस्थेला मनपा कडुन कोणतीही सवलत वा ग्रॅंट मिळत नाही. संस्थेद्वारा देखील दरवर्षी बरेच वृक्षसंस्थेच्या परीसरात लावण्यात येत आहे. या सर्व गोष्टी लक्षातघेवुन संस्थेला झाड काढण्याची परवानगी कोणतीही ठेव न घेता देण्यात यावी. असे अर्जात नमुद केले आहे. उचित निर्णयास सादर | **वृक्ष काढण्यास हरकत नाही .** | **अनामत रक्कम भरणामध्ये विशेष बाब म्हणून सदर संस्थेस सूट देण्यात येत आहे.** |
| ६ | **१.सौ.सोनाली नितीन हिरुळकर २.श्री नितीन रमेश हिरुळकर ३.श्री. राजेश अमरलाल तलरेजा राजापेठ** | **आडजात वृक्ष** | १ | न्यायालयात प्रकरण असल्याची तक्रार अर्जदार दावा ३९/२०२५ व दावा ४०/२०२५ नुसार न्याय प्रविष्ठ असल्याचे म्हटले आहे.१०० वर्षे जुने झाडांची कत्तल केल्याबाबत<br>गैरअर्जदार –१) श्री अनुराग आशिष मालु २) आशिष रमेशचंद्र मालु ३) विजय शंकरसा मामर्डे ४) सयोगिता विजय मामर्डे५) राहुल दिलीप बजाज ६) अजय धनराज खंडेलवाल रा- जयराम नगर राजापेठ अम.<br>मालमत्तेचे वर्णन – मौजे राजापेठ प्रगणे बडनेरा सर्व्हे नं. | **पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा.** | **सदर स्थळी पुन्हा पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अमरावती तक्रारकर्ते १.श्री सुध्दिर दरणे २.श्रीप्रदिप पाटिल ३. श्री आशिष कडु तक्रारकर्ते** | | | २६/१ मधिल प्लॉट नंबर ५८ सदर प्लॉटवर अग्रीमेंट प्रमाणे अर्जदार यांचा ताबा असुन दि. २७/०२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता गैरअर्जदार यांनी भाडोत्री गुंड आणुन अर्जदार यांना दमदाटकी करुन सदर जागेत असलेले १०० वर्ष जुने हिरवेकंच झाड व इतर सदर प्लॉट मधिल अनेक झाडे.याची कत्तल करुन सदर झाडाचे संपुर्ण मटेरियल चोरी करुन ट्रक मध्ये भरुन घेवुन गेले. व अर्जदार यांनी त्यांना रोकण्याचा प्रयत्न केला असता. आमचेकोणी काही बिघडवु शकत नाही. आमच्याकडे भाडोत्री गुंड असुन भक्कम राजकीय बळ आहे. प्रशासनाचे संपुर्ण नियम आम्ही धाब्यावर बसवुन शहरातील मालमत्तेवर आम्ही ताबे करतो. आम्ही लॅन्ड माफीया असुन शहरातील कुठलाही प्रशासकीय अधिकारी आमचे काही तेढे करु शकत नाही. असे गैरअर्जदारांनी अर्जदारांना धमकावले तरी गैरअर्जदारावर त्वरीत १०० वर्षे जुने झाडे तोडण्याच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात यावे. करीता लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. तक्रारीनुसार वृक्षतोडल्याचे दिसुन आले नाही. तथापि प्लॉट वर बांधकाम सुरु असल्याचे (मालु यांचे) समजले. बांधकाम परवानगी घेतली किंवा कसे या बाबत संबंधित अभियंत्यांनी अधिक पाहणी करुण अहवाल दयावा.<br>उपअभियंता मध्य झोन क्रं २ यांना पाहणी अहवाल सादर करणे बाबत पत्र देण्यात आलेले आहे. जा.क्र०९ दि. ०२/०४/२०२५ उचित निर्णयास सादर. | | |
| ७ | **श्री. विनोद खंडेलवाल खापर्डे वाडा राजकमल चौक अमरावती** | **कडुनिंब फांदया** | २ | वृक्षाच्या फांद्या तोडल्याची तक्रार होती.त्यानुसार दि. ०२/०४/२०२५ रोजी स्वास्थ निरीक्षक यांनी स्थळ निरीक्षण केले असता प्राप्त अहवाल प्रभाग क्रं. १३ अंबापेठ मधिल राजकमल चौक खापर्डे वाडा येथिल परीसरामधिल दोन कडुनिंब झाडाच्या फांदया तोडलेल्या आढळुण आले असे निर्दशनास आले आहे. त्यानुसार गैरअर्जदार यांना नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५चे सेक्शन ५ कलम ८(१) व सेक्शन ८ कलम २१(१)(२) नुसार ७ दिवसात खुलासा सादर करणे बाबत नोटिस देण्यात आलेली आहे. जा.क्र ११ दि. ०२/०४/२०२५ उचित निर्णयास सादर | **पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा.** | **सदर खुलासा प्राप्त करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |

# झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती मंगला बा.देऊळकर रा.गणपती नगर अम. | गुलमोहर | १ | दि.३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर वृक्ष सार्वजनिक जागेत रस्त्याच्या कडेला छान हिरवागार व वाढलेला आहे.वृक्षाची कसलीही अडचण दिसून आली नाही.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| २ | श्री.संजू राठे रा.औरंगपुरा अम. | सिसम | १ | सदर वृक्ष सार्वजनिक जागेवरील पडलेल्या स्थितीत होता.त्वरित काढणे गरजेचे होते करिता उद्यान विभागास दि.२८/०३/२५ रोजी वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी हि विनंती. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| 3 | श्री.किरण चिंचमलातपुरे रा.भागोदय कॉलोनी | वृक्षवेल | | सदर वृक्षवेल सार्वजनिक विद्युत खांबा वर गुरफटलेला आहे. करिता उद्यान विभागास दि.०३/०४/२५ रोजी वृक्ष वेल तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी हि विनंती. | **वृक्षाच्या वेल काढण्यास हरकत नसावी** | **वृक्षाच्या वेल काढण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| .४ | श्री.धिरज आर.वैश्य रा.संजय गांधी अम. | जांभूळ | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,जांभूळ वृक्षाच्या फांद्या घरावर पसरलेल्या आहेत.पूर्ण वृक्ष तोडण्याची गरज नाही.घरावर गेलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री.गजानन सुरजुसे रा. वडाळी - | पिंपळ | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर वृक्ष मंदिराला लागून रस्त्याच्या कडेला आहे.वृक्षामुळे कसलीही अडचण दिसून आली नाही.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ६ | श्री.प्रकाश गुंजाळकर रा.यशोदा नगर अम. | अशोक | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,अर्जदार यांनी वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी ,मागितली होती.पाहणी करतांना वृक्ष पडलेला दिसला.त्या बाबतची विचारणा केली असता वृक्ष खालून किडलेला असल्याने पडला असे सांगितले. कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी हि विनंती. | **वृक्ष वाळलेला दिसून आले आहे.** | **वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आह.** |
| ७ | श्रीमती आशा | सागवान | ७ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,अर्जदार यांच्या घरातील मोकळया जागेत ७ | **वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | र.वारघडे रा.श्री कॉलोनी | | | सागवान व १ आंबा वृक्ष आहे.सागवान वृक्ष परिपक्व असल्याने नियमानुसार व धोरणाप्रमाणे ७ सागवान व वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर | | **प्रमाणे सागवान धोरणानुसार वृक्ष काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | श्री.राजेश ब.रामटेके रा.उत्तमनगर अम. | आंबा | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर आंबा वृक्ष अर्जदाराच्या घरात आहे.त्याच्या फांद्या घरावर आल्या आहेत.पूर्ण वृक्ष तोडण्याची गरज नाही,परंतु विद्युत वाहिनीवर झुकलेल्या व घरावर गेलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर | फांद्या काढण्यास हरकत नाही | **वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ९ | श्री.गजानन प्रांजळे रा.सामरा नगर अम. | आंबा | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,अर्जदाराला स्वताच्या जागेत बांधकाम करावयाचे आहे.त्याकरिता बांधकाम परवानगी व बांधकाम नकाशा अर्जासोबत जोडला आहे.आंबा वृक्ष चार ते पाच वर्षाचा असून बांधकामात अडचण होत असल्याचे दिसते.करिता नियमानुसार अनामत रक्कम व त्या वृक्षाच्या बदल्यात ३ वृक्ष लावण्याच्या अटीवर एक आंबा वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर | १ वृक्ष काढण्यास हरकत नाही | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | श्री.दिनेश का.नेमाडे रा. उत्तमनगर अम. | अंबा | १ | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर आंबा वृक्ष फार मोठा व पसरलेला आहे.त्याच्या फांद्या विद्युत वाहिनीवर व घरावर आलेल्या आहेत.पावसाळयात धोका संभवण्याची भीती आहे. करिता उद्यान विभागाच्या शक्तिमान यंत्राद्वारे सदरच्या फांद्या तोडण्याची कार्यवाही त्वरित करण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर | फांद्या काढण्यास हरकत नाही | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ११ | श्री.प्रमोद कराळे रा.गोदावरी कॉलोनी अम. | विविध वृक्ष | १० | दि.०३/०४/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता,गजानन महाराज मंदिर परिसरातील सार्वजनिक जागेतील मोठ्या वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागाच्या शक्तिमान यंत्राद्वारे तोडण्याची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२ | श्री. तौकीर पठाण रा. अंध विद्यालय अम. | | | मागील सभेतील ठराव क्र. १६ नुसार दि.३/४/२५ रोजी पाहणी केली असता,सदर महारुख वृक्ष वय अंदाजे २ वर्ष गैरअर्जदार गौरखान पठाण यांनी तोडला असल्याची तक्रार श्री.तौकीर पठाण यांनी केली होती.पाहणी केली असता वृक्षाला पुन्हा पालवी फुटून वृक्ष सुस्थितीत आहे.गैरअर्जदार यांच्या खुलाश्या नुसार त्या प्लॉट मधील वृक्षाचा काही सबंध नाही करिता सदर प्रकरण नस्तीबद्ध करण्याची | तक्रारदार व गैरअर्जदार यांचे वैयक्तिक मतभेद दिसून येत आहे. | **सदर प्रकरण नस्ती बंद करण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शिफारस करण्यात येत आहे. . उचित निर्णयास्तव सादर | | |
| १३ | श्रीमती सिंधुताई गवई रा.गगलानी नगर अम. | अनामत रक्कम | | सदर प्रकरणात अर्जदार यांना वृक्ष प्राधिकरण सभा दि.१३/१२/२४ च्या सभेतील ठराव क्र. ०८ नुसार १ गुलमोहर वृक्ष तोडण्याची मंजुरात दिली होती. त्यानुसार त्यांना अनामत रक्कम रुपये ६०००/- भरण्याबाबत पत्र देण्यात आले होते.त्यावर त्यांनी दि. २१/३/२५ रोजी पत्र देऊन अनामत रक्कम भरण्यास नकार दिला असून अनामत रक्कम कमी करण्याची विनंती केली आहे.माझ्या घरी दोन अपंग पेशंट असून माझी परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे असे पत्रात नमूद आहे. उचित निर्णयास्तव सादर. | **पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा.** | **सदर स्थळी तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांनी पुन्हा पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |
| १४ | श्री.मो.जासीर हनीफशेख रा.फ्रेजरपुरा | | | सदर प्रकरणात तक्रारदार श्री जासीर यांनी त्याच्या घरामागे राहत असलेले गैर अर्जदार मोहनसिंग बोळे यांनी अंदाजे तीन फुट उंचीचे दोन आंब्याचे झाड विनापरवानगी तोडल्या बाबतची तक्रार केली आहे.दि.०३/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता वृक्ष तोडल्याचे दिसून आले नाही. तक्रारदार व गैर अर्जदार यांचे जागे सबंधी वाद दिसून आले,तसेच तक्रारदार वारंवार तक्रार करीत असल्याचे दिसून येते.तक्रारदार व गैर अर्जदार यांना समज देण्याची शिफारस करण्यात येत आहे.उचित निर्णयास्तव सादर | **तक्रारदार व गैरअर्जदार यांचे वैयक्तिक मतभेद दिसून येत आहे.** | **सदर प्रकरण नस्ती बंद करण्यात येत आहे.** |

## झोन क्र.४

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती मीना मधुकर मेश्राम शिवाजी नगर, नवी वस्ती | कडूनिंब १ गोधन १ | २ | दि. ०४.०४.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदाराला पेट्रोल पंप मंजूर असून त्याकरिता लागणारी परवानगी व म.न.पा. बांधकाम परवानगी, कंपनी चे पत्र इत्यादी बाबी सोबत जोडलेल्या दिसून आल्या २ वृक्ष ज्यात कडूनिंब वृक्ष व गोंधन वृक्ष पेट्रोल पंप च्या आतील रस्त्याच्या मध्ये येत असल्याने तसेच कडूनिंब वृक्ष देखील प्रत्यक्ष बांधकामात येत असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. नियमानुसार पर्यायी वृक्ष लागवडीकरिता ठेव स्वीकारून (२x३=६ x२०००=१२,०००/-रु) परवानगी देण्यास हरकत नाही. इतर वृक्षाला इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे. | **पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा.** | **सदर स्थळी पुन्हा पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

## वेळेवरील विषय

सूचक :- श्री.मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती.

प्रस्ताव विषय :- अमरावती शहरातील चंदन वृक्षाची चोरटी वृक्ष तोडकरून विकणारी टोळी गजाआड केल्याबद्दल पोलीस आयुक्त श्री.नवीनचंद्र रेड्डी यांचे अभिनंदन

ठराव :- गेल्या अनेक वर्षापासून शहरातील चंदन वृक्षाची तोड करून विकणाऱ्या चोरांच्या टोळीने शहरातील न्यायाधीशाचे निवासस्थान,वनविभागाचे ऑफिस,वन संरक्षक यांचे निवासस्थान,विद्यापीठ परिसर व इतर खाजगी लोकांनी आपल्या घरी लावलेले शेकडो चंदन वृक्ष चोरट्यांनी तोडून नेली होती. वेळोवेळी पोलिसात FIR दाखल करण्यात आले होते. परंतु तपास करून देखील काहीच सुगावा लागत नव्हता.मनपा वृक्ष प्राधिकरणाने व वनराईने याबाबींचा पाठपुरवठा वेळोवेळी केला होता.

गेल्या आठवड्यात पोलीस आयुक्त श्री.नवीनचंद्र रेड्डी यांचे मार्गदर्शनात शहर पोलिसांनी मोठ्या शिताफीने चोरट्यांना संभाजीनगर जिल्हातून पकडून गजाआड केले आहे.अवैध चंदन वृक्ष तोडीचे मोठे रॅकेट शोधले असल्याचे सांगण्यात आले होते व वृत्तपत्रातही वृत्त प्रसिद्ध झाले आहे.सबब मनपा वृक्ष प्राधिकरणचे वतीने अमरावती पोलिसांचे व विशेषतः पोलीस आयुक्त श्री.नवीनचंद्र रेड्डी यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

SACHIN BANDOPANT KALANTRE

Digitally signed by SACHIN BANDOPANT KALANTRE
Date: 2025.05.02 14:43:22 +05'30'

**आयुक्त**
**महानगरपालिका, अमरावती**